# Pimpri Chinchwad Police Commissionerate

**प्रेस नोट दिनांक ०४/०२/२०२०**

**जिवे ठार मारण्याचा प्रयत्न करून जबरी चोरी करणारा सराईत गुन्हेगार गुन्हा नोंद झाले नंतर दोन तासाचे आत गजाआड :-**

आज दिनांक ०४/०२/२०२० रोजी सकाळी ११:०० वा. चे सुमारास प्रशांत लांडगे हा घरी असताना सराईत गुन्हेगार नामे ज्ञानेश्वर रामदास लांडगे, मल्लेश कोळवी व गणेश घोत्रे असे फिर्यादीचे घरी येवुन फिर्यादीचे दाराची बेल वाजवुन फिर्यादी घराबाहेर येताच त्यास शिवीगाळ करून हाताने मारहाण करीत पार्कींग जवळ ओढीत आणले मारहाण करीत असताना फिर्यादीने आरडा ओरडा केल्यामुळे त्याचे इतर मित्र जमा झाले तेव्हा सराईत गुन्हेगार ज्ञानेश्वर लांडगे याने त्याचे हातातील पिस्तुलने हवेत गोळीबार करून फिर्यादीचे गळयातील ५ तोळे सोन्याची चैन हाताने जबरदस्तीने ओढुन तोडुन घेतली. गणेश घोत्रे याने त्याचे हातातील कुऱ्हाडीने व मल्लेश कोळवी याने त्याचे हातातील लाकडी दांडक्याने घराचे समोरील सामानाची तोडफोड करून दहशत निर्माण करून तेथुन पळुन गेले व ज्ञानेश्वर लांडगे याने पळुन जाताना पण हवेत गोळीबार करून दहशत निर्माण केली. त्यावरून सदर प्रकरणी एम आय डी सी भोसरी पोलीस ठाणे येथे गु.र.नं. ४३/२०२० भा.दं.सं. कलम ३९४, ३९७, ३२३, ५०४, ५०६ व भारतीय शस्त्र अधिनियम कलम ३(२५)(२७), ४(२५) सह महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम १३५ प्रमाणे गुन्हा नोंद आहे.

सदर घटनेची माहिती मिळताच वरीष्ठ पोलीस अधिकारी यांनी घटने ठिकाणी धाव घेतली. घटनास्थळाची पाहणी करून सहाय्यक पोलीस आयुक्त श्री राम जाधव यांनी दिलेल्या सुचनेप्रमाणे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री राजेंद्र कुंटे, पोलीस निरीक्षक श्री सतीश नांदुरकर, सपोनि श्री समाधान पांचाळ, रावसाहेब बांबळे, पोहवा गवारे, पोना दिपक महाजन, विजय पारधी, पोशि स्वप्नील लांडगे, विशाल माने, विजय दौंडकर व विशाल काळे असे मिळुन दोन टीम मध्ये आरोपीचे शोधासाठी रवाना झाले. मिळालेल्या गुप्त माहिती प्रमाणे खडी मशीन रोड, कचरा डेपो परीसरात आरोपीचा कसुन शोध घेवुन गुन्हयातील आरोपी- सराईत गुन्हेगार ज्ञानेश्वर रामदास लांडगे रा. गणेश नगर भोसरी पुणे यास सापळा रचुन शिताफिने पकडुन ताब्यात घेतले.

सदरची कामगीरी मा. श्री संदिप बिष्णोई सो. पोलीस आयुक्त, मा. श्री रामनाथ पोकळे सो. अतिरिक्त पोलीस आयुक्त, मा. श्रीमती स्मिता पाटील सो. पोलीस उप-आयुक्त परिमंडळ-१, मा. श्री राम जाधव सो. सहाय्यक पोलीस आयुक्त पिंपरी विभाग यांचे मार्गदर्शनाखाली वरील नमुद पोलीस अधिकारी व पोलीस कर्मचारी यांनी केली आहे.